सुधारणा व पुनर्वसन

# जनसंपर्कअधिकारीकार्यालय, कारागृहमुख्यालय, पुणे

**P.R.O. Office, Prison Head Office, Pune**

**Address** - Office of The Additional Director General of Police and Inspector General of Prison and Correctional Services, 2nd Floor, Old Central Building, Pune -1
E-mail ID : igoffice.ecell-mh@gov.inPh. No. 020 26124815

**प्रेसनोटक्रमांक : 02/2025दिनांक : 26/01/2024**

## प्रेस नोट

## येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे. २६ जानेवारी २०२५- प्रजासत्ताक दिन.

मा. डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से), विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), महाराष्ट्र राज्य, पुणे व अधिकारी / कर्मचारी यांचे उपस्थितीत आज दि.२६.०१.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

ध्वजारोहण मा. डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से), विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शुभहस्ते करण्यात आले. तसेच २६ जानेवारी २०२५ करीताचे कारागृह विभागातील एकूण २६ अधिकारी / कर्मचारी यांना सन्मानीय राष्ट्रपतींचे गुणवत्तापूर्ण सेवेबाबतचे राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. त्यामध्ये श्री. विवेक झेंडे, अति. अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, श्री. सुनिल तांबे, उपअधीक्षक, कारागृह मुख्यालय, श्री. अहमद मणेर, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह. श्री. तुळशीराम गोरवे, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह, श्री. गणेश महादेव गायकवाड, येरवडा मध्यवर्ती कारागृह, श्री. प्रल्हाद दत्तात्रय कुदळे. हवालदार, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे यांना सन्मा. राष्ट्रपतीचे उल्लेखनिय सेवेसाठी पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचा मा.महोदयांचे शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच १५ ऑगस्ट २०२३ करीताचे उल्लेखनीय सेवेबाबतचे राष्ट्रपतींचे सुधारसेवा पदक श्री. सुनिल ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, श्री.तात्यासाहेब निंबाळकर, तुरूंगाधिकारी श्रेणी-१, अ.पो.म.सं. कार्यालय, पुणे, श्री. प्रकाश बाबुराव उकरंडे, तुरुंगांधिकारी श्रेणी-१, येरवडा मध्यवती कारागृह, श्री. आनंदा शंकर हिरवे, सुभेदार, येरवडा मध्यवर्ती कारागृह व गुणवत्तापूर्ण सेवेबद्दलचे राष्ट्रपतींचे सुधारसेवा पदक श्री. अनिल खामकर, अधीक्षक, येरवडा खुले कारागृह, श्री. विजय कांबळे, अधीक्षक, सांगली जिल्हा कारागृह, श्री. तानाजी कृष्णा धोत्रे, तुरुंगाधिकारी श्रेणी-२, येरवडा मध्यवर्ती कारागृह व श्री. प्रकाश महादेव सातपुते (सेवानिवृत्त) येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांना घोषीत झाले होते. सदर अधिकारी/ कर्मचारी यांना आज रोजी प्रजासत्ताक दिनी मा.श्री.अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा पालकमंत्री पुणे यांचे शुभहस्ते पोलीस मुख्यालय, पुणे शहर पुणे येथे गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारागृह अधीक्षक श्री सुनिल ढमाळ, श्री. सुहास पवार, अधीक्षक, कारागृह मुख्यालय, श्रीमती. पल्लवी कदम, अति. अधीक्षक, श्री.सुनिल तांबे, पोलीस उपअधीक्षक, कारागृह मुख्यालय, श्री.भाईदास ढोले, उपअधीक्षक, श्री रविंद्र गायकवाड, उपअधीक्षक, श्री. मंगेश जगताप, उपअधीक्षक, श्री आनंदा कांदे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृहाकडील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच कारागृह मुख्यालयाकडील स्विय सहायक श्री कैलास शेटे व इतर कक्ष अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.